ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

गुरुवार, १४ एप्रिल २०१६

सामना



महापालिका शाळांतील किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी गुन्हेगारीबाबत मार्गदर्शन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तुषार दोशी. यावेळी स्मिता आपटे, कैलास काटकर, डॉ. मिलिंद भोई उपस्थित होते.

# आठवड्यातून एकदा तरी मुलांचा मोबाईल तपासावा- तुषार दोशी

पुणे : आत्ताच्या काळात इंटरनेटद्वारेही अभ्यासाचे साहित्य उपलब्ध होत असल्याने शालेय मुलांनी मोबाईलचा वापर केला पाहिजे. मुलांना पूर्णपणे माहिती नसल्याने इंटरनेटच्या दुरुपयोगामुळे सायबर गुन्हेही घडू शकतात. त्यामुळे इंटरनेटचा वापर चांगल्या कामासाठी होत आहे की नाही, यासाठी पालकांनी आठवड्यातून एक-दोन वेळा तरी मोबाईल तपासला पाहिजे, असे मत पोलीस उपायुक्त तुषार दोशी यांनी व्यक्त केले.

'पंख' संस्था आणि 'क्विक हील फाऊंडेशन' यांच्यातर्फे महापालिका शाळांतील किशोरवयीन मुला-मुलींना गुन्हेगारीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित 'थेट भेट' कार्यक्रमात ते बोलत होते. भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई, दहशतवादविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक अरविंद गोकुळे, आदर्श मित्रमंडळाचे अध्यक्ष भाई जगताप, 'क्विक हील फाऊंडेशन'चे सीईओ कैलास काटकर, अजय शिर्के, 'पंख' संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे यावेळी उपस्थित होते.

दोशी म्हणाले, मुलांनीही फेसबुक, व्हॉट्सअॅपवर आलेले मेसेज न पाहता फॉरवर्ड करू नयेत. मुलींच्या छेडछाडीबद्दल दोशी म्हणाले, प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये महिला पोलीस असल्याने मुलींनी न घाबरता तक्रार द्यावी.

काटकर म्हणाले, 'आजूबाजूला घडणाऱ्या चांगल्या गोष्टींकडेच मुलांनी लक्ष दिले पाहिजे. चांगल्या मार्गाने कष्ट घेतल्यास यश नक्कीच मिळते. टेक्नॉलॉजीचा वापर चांगल्याच गोष्टींसाठी केला पाहिजे.